# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१०/०१/२०२०

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, विशेष तपास पथकाची कारवाई

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलायाचे कार्यक्षेत्रामध्ये ए.टी.एम. चोरीचे गुन्हे घडत असल्याने गुन्हयास आळा बसण्याच्या दृष्टीने **पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सो** यांनी घडलेल्या गुन्ह्यांची लवकरात लवकर उकल व्हावी यासाठी अपर पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त सुधिर हिरेमठ, यांचे मार्गदर्शनाखाली व सहायक पोलीस आयुक्त श्री आर.आर. पाटील व श्रीधर जाधव यांचे देखरेखी खाली **एस.आय.टी.(विशेष तपास पथक) या पथकाची** स्थापना केली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातातील ए.टी.एम. चोरीच्या गुन्ह्याबाबत तपास करीत असताना आळेफाटा येथे दि. ६/१२/२०१९ रोजी दरोड्याचे तयारीत असलेल्या आरोपी **(१) अभिजीत उर्फ निकेतन गोकुळ साळवे, वय २२ वर्षे रा. हरि निवास बिल्डींग, फ्लॅट नं. १२, जिल्हा नाशिक (२) राहुल भगवान साळवे, वय २४ वर्षे रा. नाशिक, द्वारका, जि. नाशिक (३) अरुण ज्ञानेश्वर भांगरे, वय २४ वर्षे रा. संगमनेर, जि. अहमदनगर (४) सागर अनिल दैवज्ञ, वय २५ वर्षे रा. पारनेर, जि. अहमदनगर** या चार इसमांना आळेफाटा पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे अटक करण्यात आली होती त्यावेळी आरोपी यांनी तेथील पोलीसांना कोणत्याही गुन्ह्याची कबुली दिली नव्हती. सदर आरोपींची गुन्हा करण्याची पध्दत पाहता ती पिंपरी चिंचवड हद्दीत घडलेल्या काही दाखल गुन्ह्याशी मिळती जुळती असल्याने त्यांना वर्ग करून घेवन त्यांचेकडे पोलीस कस्टडी दरम्यान सखोल तपास करता त्यांनी खालील एकुण ३ ठिकाणी गुन्हे केल्याचे उघड झाले.

**१) त्र्यंकबेश्रर रोडला बाबा महाराज, नाशिक यांचे मठात दानपेटी फोडुन चोरी**
**२) उत्तमनगर नाशिक येथे आय.सी.आय.सी.आय बँकचे ए.टी.एम. फोडण्याचा प्रयत्न**
**३) त्र्यबंकेश्वर रोड येथील एस.बी.आय. बँकेचे ए.टी.एम. फोडण्याचा प्रयत्न व बॅटरी चोरी**

दरम्यान माहिती मिळाली की, ए.टी.एम. मशिन फोडणारा, चोरी करणारा व बऱ्याच गुन्ह्यामध्ये फरार असलेला सराईत आरोपी **वकिल उर्फ शकील मोहम्मद हारुन,वय वर्षे, रा.खुलीका गाव, ता.हतीन, जि.पलवाल (हरीयाणा)** याचेवर **हरीयाणा पोलीसांनी ५० हजार रूपायाचे बक्षीस** ठेवले होते. त्यास दिल्ली पोलीसांनी अटक केली आहे असे समजल्याने वरिष्ठांचे परवानगीने विशेष तपास पथकाची टिम दिल्ली येथे पाठवुन आरोपी यास दिल्ली न्यायालयातुन वर्ग करून दि.१६/०७/२०१९ रोजी मराठा चेबर्स, टेल्को रोड, भोसरी येथील आय.सी.आय. सी.आय. बॅकेचे ए.टी.एम. फोडल्याचे घडले्ल्या गुन्ह्यामध्ये दि.२८/१२/२०१९ रोजी अटक करण्यात आली होती. पोलीस कस्टडी रिमांडमध्ये तांत्रिक विश्लेषण, मिळालेले सी.सी. टिव्ही फुटेज, इतर आरोपी बाबतची माहिती याबाबत त्याच्याकडे सखोल चौकशी करून आरोपीने त्याचे चार साथीदारासह स्वीफ्ट कारमधुन येवुन दि.१०/११/२१९ रोजी नेवाळेवस्ती, चिखली येथील ॲक्सीस बँकेचे ए.टी.एम. मशिन गॅस कटरच्या सहाय्याने दि.१०/११/२०१९ रोजीचे रात्री कट करून ११,५०,१००/- रु रोख रक्कम चोरी गेली होती सदरचा गुन्हा केल्याची कबुली त्याने दिली आहे. सदर बाबत चिखली पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. ६४५/२०१९ भादवि कलम ३८०,४२७ अन्वये दि.११/११/२०१९ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यामध्ये त्यास वर्ग करून त्याची दि.१३/०१/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळालेली आहे.

चार आरोपी हे हरीयाणा राज्यातील नुहू जिल्ह्यातील असल्याची माहिती त्याने सांगितले. आरोपीने दिलेल्या साथीदारांचा शोध घेणेसाठी वरिष्ठांच्या परवानगीने दि.४/०१/२०२० रोजी विशेष तपास पथकातील सहायक पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, एक पोलीस उप निरीक्षक व सहा कर्मचारी यांची टिम फिरोजपुर, जि.नुहू, हरीयाणा येथे दि.४/०१/२०२० रोजी जावुन वरील आरोपीने सांगितलेल्या पैकी दोन इसमांना **१) जाकर उर्फ जाकीर इद्रीस खान, वय ३६ वर्षे, रा.फिरोजपुर झिकरा, जि.नुहू मेवाल, हरीयाना राज्य २) इनाम नसरू खान, वय ३३ वर्षे, रा.सदर** यांना ताब्यात घेण्यात येऊन त्यांना दि.०८/०१/२०२० रोजी वरील गुन्ह्यात अटक करून मा.न्यायालयात हजर केले असता त्यांची दि.१७/०१/२०२० रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळालेली आहे. सदर गुन्ह्यात एक स्वीफ्ट कार, गॅस कटर व चोरीस गेलेली रक्कम हस्तगत करणे बाबत तपास करीत आहोत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदिप बिष्णोई, सह पोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त श्री आर.आर.पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली एस.आय.टी. पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, सहा पोलीस निरीक्षक सतिश कांबळे, सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस उप निरीक्षक विजय जगदाळे, सपोफौ सुभाष सावंत तसेच पोलीस कर्मचारी मंगेश गायकवाड, सचिन असवले, सोमनाथ बोऱ्हाडे, कबीर पिंजारी, विशाल भोईर, महादेव जावळे, नितीन खेसे, पंकज भदाने, प्रविण पाटील यांनी केली आहे.